नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

दिनांक 21/10/2021 (गुरूवार)
(सकाळ)

---

## घरफोडी

पो.स्टे. देवलापार :– अंतर्गत 10 कि.मी. अंतरावरील मौजा बेलदा येथे दिनांक 20/10/2021 चे 11.00 वा. ते 18.00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– सौ शेवंती जयलाल भलावी वय 45 वर्ष रा. बेलदा यांचे राहते घराचे मागील दाराची अज्ञात आरोपीने कडी तोडून घरात प्रवेश केला. यानंतर आरोपीने लोखंडी आलमारीचे वर ठेवलेल्या लोखंडी पेटीचा कुलुप तोडून त्यामधील सोन्या– चांदीचे दागिने असा एकुण कि. 19,000/–रू. चा मुद्देमाल चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. देवलापार येथे आरोपीविरुध्द कलम 454, 380 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोहवा अशोक उईके मो क्र. 7720824629 हे करीत आहे.

## चोरी

1) पो.स्टे. काटोल :– अंतर्गत 10 कि.मी. अंतरावरील पारडसिंगा मंदीर परीसर येथे दिनांक 19/10/2021 चे 13.30 वा. ते 16.00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– श्रीमती हिरुबाई श्रावणजी सातपुते वय 65 वर्ष, रा. बेसखेडा ता वरूड जि. अमरावती या मोहल्यातील बायासोबत पारडसिंगा मंदीर येथे दर्शनाकरीता आल्या होत्या. त्या दर्शनाकरीता रांगेत लागल्या तेव्हा गळयातील सोन्याची चैन काढून जवळ असलेली पर्समध्ये ठेवली दर्शन घेवून गाडी कडे जात असता बॅगची चैन उघडी दिसली म्हणून फिर्यादीने बॅग चेक केली असता बॅगमध्ये सोन्याची चैन किमंती 42,000/–रू. ची दिसुन आली नाही. अज्ञात आरेपीने गर्दीचा फायदा घेवून फिर्यादीचे बॅगमधून सोन्याची चैन चोरून नेली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम 379 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास मपोहवा पंचफुला मोरे मो.क्र. 9049607115 या करीत आहे.

2) पो.स्टे. मौदा :– अंतर्गत कढोली शिवार येथे दिनांक 20/10/2021 चे 14.00 वा. ते दिनांक 14.05 वा. दरम्यान फिर्यादी नामे– सौ. प्रमिला परमानंद मेश्राम वय 54 वर्ष, रा. गुमथळा या दळण घेवुन पायदळ कढोली कडे जात असता भंडारा कडुन पांढऱ्या रंगाचा स्कुटीने अज्ञात आरोपी वय अंदाजे 30 ते 35 वर्ष हा हेल्मेट लावुन फिर्यादी जवळ आला व ''मावशी कुठे जात आहे'' असे म्हटले असता फिर्यादीने कढोली ला दळण दळण्याकरिता जात आहे. तेव्हा त्या आरोपीने ''मी सोडुन देतो'' असे म्हटल्याने फिर्यादी स्कुटी वर बसुन कढोली पर्यंत आली अज्ञात आरोपीने फिर्यादीला मोबाईल फोन करण्याकरीता मोबाईल मागीतले असता फिर्यादीने फोन दिल्याने अज्ञात आरोपीने फिर्यादीचा कि. 10,000/–रू. चा मोबाईल घेवुन आपल्या स्कुटीने पळुन गेला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम 379 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोउपनी श्री ठाकुर हे करीत आहे.

## अकस्मात मृत्यू

पो.स्टे. नरखेड :– अंतर्गत 18 कि.मी. अंतरावरील उमरी येथे दिनांक 20/10/2021 चे 12.00 वा. ते 12.15 वा. दरम्यान मनीष खुशाल चोपडे (मृतक), वय 22 वर्ष रा. उमरी हा स्वताचे शेतातील विहीरीजवळ वाढलेले झाडझुडपे काजबन तोडत असतांना त्याचा तोल जावुन पाय घसरून विहीरीत पडुन बुडून तो मरण पावला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– खुशाल रामचंद्र चोपडे, वय 45 वर्ष, रा. उमरी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. नरखेड येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस हवालदार धनराज भुक्ते 9823612858 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर